# मला भावलेले डॉ. आर. व्ही. भोसले सर

**ज्येष्ठ अवकाश शास्त्रज्ञ डॉ. आर. व्ही. भोसले यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचे मार्गदर्शन लाभलेल्या डॉ. प्रमोद शंकरराव उर्फ पी. एस. पाटील यांनी जागविलेल्या आठवणी.**

डॉ. भोसले सर भारतात परत आल्यानंतर डॉ. विक्रम साराभाई यांच्या सल्ल्यानुसार फिजिकल संशोधन संस्था (Physical Research Laboratory), अहमदाबाद या विख्यात राष्ट्रीय संस्थेत रुजू झाले. येथील संचालक या पदावरून १९८९ साली निवृत्त होऊन माजी कुलगुरू डॉ. के. बी. पवार यांच्या आग्रहास्तव, शिवाजी विद्यापीठात भौतिकशास्त्र विभागात Emeritus Professor या पदावर रुजू झाले. मी याच अधिविभागमध्ये १९९० मध्ये रुजू झालो. भोसले सरांनी तरुण प्राध्यापकांची टीम तयार केली, त्यामध्ये मी, डॉ. प्रमोद वासंबेकर व काही विद्यार्थी समाविष्ट होतो. या अनुषंगाने त्यांचा परीस स्पर्श झाला. सरांनी Space Science हा महत्वाकांक्षी अभ्यासक्रम सुरू केला. त्यासाठी लागणारी काही जुनी उपकरणे विविध संस्थेकडून बक्षिसरूपी मिळवली.त्यांचा उत्साह पाहून आम्हालाही खूप प्रेरणा मिळाली. येथील विद्यार्थी यथायोग्य बौध्दिकता, कार्यकुशलता व गुणवत्तेने परिपूर्ण असले पाहिजेत असे त्यांना नेहमी वाटे. आम्हाला या नवीन क्षेत्रातील योग्य व



दर्जेदार प्रशिक्षणासाठी इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ गीओमग्नेटिझम (IIG), मुंबई येथे पाठविले. त्यानंतर लगेचच एका महत्वाकांक्षी प्रोजेक्टसाठी IIG व ऑस्ट्रेलिया मधून तज्ज्ञांना आमंत्रित केले. त्यातून राजाराम तलाव परिसरात अत्याधुनिक पी. आर. रडार सिस्टिम उभारली. कोल्हापूरचे सुपुत्र असल्यामुळे शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण दिले गेले पाहिजे, असा त्यांचा आग्रह असे. त्यांच्या ISRO, PRL, IIG, DST अशा नामांकित शिक्षण संस्थेतील वैज्ञानिक मित्रांना आमंत्रित करून एक मोठी कार्यशाळा घेतली. डॉ.कस्तुरीरंगन, माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम आदी प्रख्यात शास्त्रज्ञाबरोबर त्यांचा स्नेह होता. कॅनडा व अमेरिकेतील स्टॅनफर्ड विद्यापीठात कार्यरत असताना त्यांनी पन्हाळा येथे संशोधनासाठी दर्जेदार व अत्याधुनिक सुविधा असावी, हे स्वप्न पाहिले. त्यामुळेच त्यांनी वरील महत्वकांक्षी प्रोजेक्ट पूर्ण झाल्याबरोबर, त्यादिशेने लगेचच आपला मोर्चा वळविला. माननीय कुलगुरू व जिल्हा अधिकारी यांना पन्हाळा येथील एक एकर जागा विद्यापीठाला मिळण्यासाठी अर्ज केला. तब्बर २५ वर्षानी कुलगुरू डॉ. एन. जे. पवार सर असताना विद्यापीठाला ही जागा मिळाली. सध्या या जागी ISRO च्या सहकार्यातून IRNSS नावाची GPS साठी लागणारी कार्यप्रणाली सुद्धा उपलब्ध आहे. जवळ जवळ ३० वर्षांच्या निवृत्ती नंतरच्या कालावधीत त्यांचे अनमोल मार्गदर्शन विद्यापीठाला लाभले. त्यांनी डॉ. राजीव व्हटकर, डॉ. पी. टी. पाटील, डॉ. दादा शेट्टी, डॉ. दादा नाडे, डॉ. सी.टी. मोरे असे अनेक चांगले विद्यार्थी घडविले. त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वामुळे माझ्या सारख्या अनेकांना प्रेरणा मिळत राहिली. ९० व्या वर्षी सरांच्या आयुष्यावरील कुडित्रेच्या कुंभी कासारी शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी पी. टी. पाटील यांनी लिहिलेल्या 'स्मृती तरंग' पुस्तकाचे प्रकाशन झाले.

**भारतातील पहिला रेडिओ टेलिस्कोप बनविण्याचा बहुमान**

डॉ. आर. व्ही. भोसले १९६० मध्ये रेडिओ टेलिस्कोप बनविणारे पहिले भारतीय शास्त्रज्ञ ठरले होते. विशेष म्हणजे त्याच वर्षी त्यांनी भौतिकशास्त्रात पीएचडी संपादन केली होती.

स्नेहधाम येथे २० फेब्रुवारी २०२० रोजी संजय घोडावत विद्यापीठाने भोसले सरांच्या कार्याचा डॉ. हिर्डेकर यांच्या हस्ते सत्कार करून मानपत्र बहाल केले. त्याप्रसंगी सुद्धा त्यांनी ६० वर्षांपूर्वी केलेल्या एका महत्वपूर्ण प्रयोगविषयी माहिती दिली. अजून बरेच काम करायचे आहे, असे ते नेहमी म्हणत. वयाच्या नव्वदित सुद्धा तुम्ही काम कर, मी तुम्हाला मदत करेन असे म्हणायचे.

सरांना त्यांच्या सुविद्य पत्नी विजयाताई यांची समर्थ साथ लाभली. अशा, करवीर नगरीतील अंतरिक्षातील एका चमकत्या ताऱ्याच्या निधनाने एक झंझावाती शास्त्रज्ञ काळाच्या पडद्याआड गेला आहे. अवकाशशास्त्र या शैक्षणिक क्षेत्रात भरून न येणारी पोकळी निर्माण झाली. त्यांनी सुरू केलेल्या सर्व उपक्रमांना गती देऊन एका वेगळ्या उंचीवर नेण्याचं कार्य सध्या भौतिकशास्त्र विभागात सुरू आहे. त्यांच्या स्वप्नांची पुर्ती करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

**-डॉ. पी. एस. पाटील,**
विभाग प्रमुख, भौतिक शास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ